महाराष्ट्र भूदान प्रकाशन : ५ वें

# जीवनदान

२८५५
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ९८१



श्री. जयप्रकाश नारायण

REFBK-0008526

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

आवृत्ति तिसरी जानेवारी १९५५ ]

किंमत २ आणे

REFBK-0008526

# जीवनदानाचें आ

बोधगयेचें सर्वोदय संमेलन हें एका नव्या चळवळीचा-जीवनदानाचा-प्रारंभ म्हणून गाजलें. विनोबाजींनीं भूदानाचें आंदोलन सुरू केल्यापासून त्यांतूनच स्वाभाविकपणें साधनदान, संपत्तिदान, श्रमदान, बुद्धिदान, प्रेम-दान अशा निरनिराळ्या चळवळी अंकुरल्या आहेत. मूळ आंदोलनांतून ओघानेंच ही वाढ झाली. यांच्याप्रमाणेंच जीवनदानहि त्यांतच सुप्तावस्थेंत होतें आणि अनुकूल वेळ येतांच तें त्यांतून प्रकट झालें. किंबहुना आतां अशी अवस्था आली होती कीं, जीवनदानाचें नवजीवन दिल्याशिवाय ही चळवळ वाढण्याचा संभव राहिला नव्हता.

आंदोलनाच्या या गतींत माझाहि थोडा वांटा आहे म्हणून मी तें थोडक्यांत समजावून देऊं इच्छितों. अलिकडे त्यावर ज्या टीका प्रसिद्ध झाल्या आहेत त्यांवरून जीवनदान-आंदोलनाची समज लोकांना बरोबर झालेली नाहीं असें दिसतें.

हा जीवनदानाचा निर्णय मला एकदमच स्फुरला असें नाहीं. गेले कित्येक महिने मी हळूहळू त्याकडे चाललों होतों. याचा अर्थ असाहि नव्हे कीं, आजवर जीं ध्येयें मीं उराशीं बाळगलीं तीं मीं टाकून दिलीं. उलट तीं ध्येयें भूदानाच्या किंवा गांधीवादाच्या मार्गानेंच साध्य होतील आणि स्थिर होतील असें मला दिसून आलें.

## जीवनदानाचा आशय

तेव्हां 'जीवनदाना'चा संपूर्ण आशय काय? एखाद्या कार्यासाठीं जीवन अर्पण करणें या अर्थानें जीवनदान ही कांहीं नवीन गोष्ट नाहीं. इतकेंच नव्हे तर, बोधगया येथें ज्यांनीं आपलें जीवनदान जाहीर केलें त्यांपैकीं पुष्कळांचें जीवन अगोदरच वाहिलेलें होतें. मग त्यांनीं पुनः जीवनदान करण्याची काय गरज? आणि त्याकरितां राजकारण सोडण्याची प्रतिज्ञा कशाला?

पहिली गोष्ट म्हणजे जीवनदान म्हणजे एखाद्या कार्याकरितां जीवन वाहून टाकणेंच आहे. पण येथें हें जीवन एका विशिष्ट कार्याला वाहिलेलें

आहे; केवळ लोक समजतात तेवढ्या भूदानालाच नव्हे, तर तें ज्या ध्येयांचें प्रतीक आहे त्यांना. बोधगयेला ज्यांनीं जीवनदान केलें त्यांनीं आपलें जीवन पूर्वीं राजकारण, हरिजनसेवा, खादी इत्यादींना वाहिलेलें असूनसुद्धां आतां पुन: जीवनदान केलें तें तींच कामें करीत राहण्याची पुनः प्रतिज्ञा करण्या-करितां आणि त्या अर्थानें तें उगीचच केलें असें नव्हे. त्यांना आतां भूदान-आंदोलनाचें इतकें संपूर्ण दर्शन झालें कीं, त्याकरितां इतर सर्व कार्यें ( राजकारणसुद्धां ) सोडून याच एका कार्याकडे पुढचें आयुष्य लागलें पाहिजे अशी त्यांची खात्री पटली.

## भूदानाचा गर्भितार्थ

भूदानांत असें काय आहे ? वरवर पाहणाऱ्यांना ही एक शेतीसुधारणेची चळवळ आहे, जास्तींत जास्त तिच्यामुळें कायदा करण्याची भूमिका तयार होईल असें वाटतें. पण खोल पाहणाऱ्यांना ही फार अर्थपूर्ण चळवळ असल्याचें दिसून येईल. समाजाच्या आणि माणसांच्या सर्वांगीण क्रांतीचा हा आरंभ आहे; माणसाच्यासुद्धां, कारण तिचें उद्दिष्ट समाजाबरोबर माणसालाहि बदलणें हें आहे. क्रांतीचें महात्मा गांधींचें अहिंसक तंत्र मोठ्या प्रमाणावर लागू करण्याचा हा प्रयोग आहे.

गांधीजींचें तंत्र मतपरिवर्तनाचें होतें हें सर्वांना माहीत आहे. नव्या समाजनिर्मितीकरितां हिंसा वर्ज्य केली पाहिजे, इतकेंच नव्हे तर, त्याकरितां कायदा हें पहिलें साधन करून त्याचा आधार घेतां कामा नये, असें त्यांचें म्हणणें होतें. आगाखानच्या वाड्यांत असतांना ते प्यारेलालना म्हणाले होते, ‘ जोंवर आमच्या हातीं सत्ता नाहीं तोंवर अनन्यगति म्हणून मतपरि-वर्तन हें आमचें साधन राहील, पण सत्ता आल्यानंतर तें आम्हीं स्वेच्छेनें स्वीकारलेलें साधन झालें पाहिजे असें माझें मत आहे. कायदा होण्या-अगोदर मतपरिवर्तन झालें पाहिजे. ’ मनवळवणी, हृदयाचा आणि मनाचा बदल, नव्या सामाजिक मूल्यांची निर्मिति आणि त्याबरोबरच तदनुकूल लोकमताची हवा तयार करणें आणि जेथें मनवळवणी अपुरी पडेल तेथें अन्यायाशीं असहकार, हीं गांधीजींचीं शस्त्रें होतीं. त्यांनीं दुहेरी काम साधतें : समाजाचा बदल आणि माणसाचाहि बदल. कायद्यानें समाजाचा बदल होऊं शकतो, पण माणसाचा बदल करणें त्याला शक्य नाहीं. कायद्यानें

हृदयाचें किंवा मनाचें परिवर्तन झालें किंवा सक्तीनें मनुष्य सद्‌गुणी बनला हें कधींच शक्य नाहीं. मनुष्य हा सुधारणें शक्य आहे, या निष्ठेवर गांधीजींचें मतपरिवर्तनाचें तंत्र आधारलेलें आहे. या निष्ठेचासुद्धां आधार दुसऱ्या एका निष्ठेवर आहे. ती ही कीं, वरवरची भिन्नता असली तरीसुद्धां माणसें हीं मुळांत एकच आहेत, त्यांची अंतःकरणप्रवृत्ति सत् आहे.

आजच्या समाजाला सुधारण्याकरितां गांधीजींनीं आपल्या तंत्राचा उपयोग कसा केला असता हें कोण सांगणार ? परंतु, प्यारेलालजींनीं म्हटल्याप्रमाणें, 'गांधीजींचा विचार आज पुनः जन्माला आला आहे, विनोबा त्याचा पाठपुरावा करीत आहेत आणि त्यांत त्यांना आश्चर्यकारक यश मिळालें आहे.- बापू भविष्यवाणी सांगावी त्याप्रमाणें ज्या सर्वांगीण सामाजिक जागृतीविषयीं बोलत तिचाच आरंभ आज आपण पाहात आहों.'

तेव्हां भूदान ही मतपरिवर्तनाची आणि विचाराचें व जीवनमूल्याचें नवें वातावरण निर्माण करणारी फार मोठ्या प्रमाणावरील चळवळ आहे. माणसांच्या मनांत आणि त्यांच्या परस्परांच्या संबंधांत जिवंत आणि ताबडतोब क्रांति घडवून आणणारी ती चळवळ आहे. शोषणाच्या आणि विषमतेच्या पद्धतीवर आघात करून येथल्या येथें त्यांत ती सुधारणा घडवून आणते. आपल्याजवळ जें कांहीं आहे तें आपल्या बांधवांबरोबर वांटून घ्यावयाला ती माणसांना शिकविते.

**प्रथम जमीनच कां ?**

ही क्रांतिकारी प्रक्रिया शेतजमिनीव्यतिरिक्त अनेक क्षेत्रांत सुरू करतां आली असती. परंतु हें क्षेत्र प्रथम घेण्याचें कारण—( १ ) जमीन हें उत्पादनाचें मूळ साधन आहे, ( २ ) जमिनीचा प्रश्न हा अत्यंत निकडीचा प्रश्न आहे, ( ३ ) आपल्या ग्रामप्रधान देशांतील फार मोठ्या लोकसंख्येच्या जीवनाशीं त्याचा संबंध आहे. परंतु सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे जमिनीच्या माध्यमाच्या द्वारा नवा आर्थिक विचार आणि सामाजिक नीतिमूल्यें यांचा प्रसार करणें जितकें सोपें आहे तितकें दुसऱ्या कोणत्याहि मालमत्तेचें माध्यम घेऊन होणार नाहीं. जमिनीच्या बाबतींत भूदानाचें जें सांगणें तेंच, गांधीजींच्या मतानें, आमच्याजवळ असणाऱ्या सर्व परिग्रहाला लागू आहे, त्यांत ज्ञान आणि कर्मकुशलता हींहि आलींच.

सर्व संपत्ति ही समाईक निर्मिति आहे आणि समाजाच्या सहकार्याशिवाय कांहींहि मिळवितां येणार नाहीं. म्हणून जें कांहीं आमच्यापाशीं आहे तें सर्व समाजाचें आहे; त्याचे आम्ही केवळ विश्वस्त आहों, त्याचा आम्ही उत्तम रीतीनें सांभाळ करावा आणि त्याचा स्वतःकरितांच नव्हे तर साऱ्या बांधवांकरितां उपयोग करावा या हेतूनेंच जणूं समाजानें तें सर्वस्वीं आमच्या ताब्यांत दिलें आहे. परंतु शेतजमिनींच्या बाबतींत, जमीन ही निसर्गाची देणगी असल्यामुळें, ती साऱ्या समाजाच्या मालकीची आहे, हा विचार जसा मनाला एकदम पटतो, तसा व्यापाराच्या, उद्योगाच्या किंवा व्यवसायाच्या क्षेत्रांत तो एकदम पटत नाहीं. परंतु आमच्या पांच लक्ष खेड्यांतून जेव्हां या विचाराचीं बीजें भूदानामुळें रुजतील आणि लक्षावधि जमीनमालकांचीं मनें तो विचार अंमलांत आणण्याकडे वळतील, तेव्हां तो अंमल सर्वांशीं न झाला तरीसुद्धां त्यायोगें हा विचार मूळ धरण्याला आणि तो इतर क्षेत्रांतहि वाढण्याला एक मानसिक अनुकूल वातावरण तयार होईल. भूदान-यज्ञानें तसें अनुकूल वातावरण बरेंच निर्माण केलें आहे आणि म्हणूनच बोधगया संमेलनांत संपत्तिदानाकडेहि तितकेंच लक्ष पुरविण्याचें ठरविण्यांत आलें.

### ही क्रांतीची चळवळ

या आर्थिक क्रांतीच्या वातावरणांतच समाजपुनर्रचनेचें कार्यहि हातीं घ्यावें लागेल. आजहि खादी, ग्रामोद्योग इत्यादि रचनात्मक कामें सुरू आहेत. परंतु त्यांनीं आजच्या समाजस्थितीला धक्का दिलेला नाहीं. त्यामुळें तें केवळ मदत पोंचविण्याचेंच काम राहतें. ही कांहीं रचनात्मक कामाविषयीं गांधीजींची कल्पना नव्हती. ते तर स्वतः मोठे क्रांतिकारक होते. मार्ग शोधून काढण्याचें काम विनोबांच्या प्रतिभेनें केलें. पुष्कळ रचनात्मक कार्यकर्त्यांना वाटतें कीं, भूदानाचें काम आपल्याला सवडीनें किंवा अनेकांपैकीं एक काम म्हणून करतां येईल. परंतु जे स्वतःला गांधीवादी किंवा अहिंसक क्रांतिवादी म्हणवितात, त्यांना भूदान हें तसें ‘ अनेकांपैकीं एक ’ काम असतां कामा नये. कारण तें त्यांच्या अस्तित्वाचाच मूळ आधार आहे. भूदानाच्या कार्यामुळेंच रचनात्मक कार्याला अर्थ येतो, नाहीं तर तें प्रेतवत् आहे, जड आहे. भूदान म्हणजे वाहती नदी आणि रचनात्मक कामें या

होड्या समजा. वाहतें पाणी नसेल तर नुसत्या होड्या चिखलांत रुतलेल्या जड वस्तूच होतील.

### दंडशक्ति विरुद्ध जनशक्ति

रचनात्मक कार्यकर्त्यांना जसें हें इतर कामांपैकींच एक काम असें वाटतें तशीच पुष्कळ राजकारणी लोकांची, ही एक बरी चळवळ आहे, पुढें कायदा करून उद्दिष्ट साध्य करण्याला तिची बरी मदत होईल, अशी एक कृपादृष्टीची विचारसरणी आहे. ते म्हणतात, आम्ही आमचें सहकार्य हळूहळू आमच्या फार महत्त्वाच्या कामांतून सवड होईल त्याप्रमाणें, या कामाला देऊं ; शेवटीं आम्ही म्हणूं तेंच होणार आहे, असे दूरगामी सामाजिक आणि आर्थिक बदल काय सरकारवांचून घडवून आणतां येतील ?— हीच सर्वसामान्यपणें राजकारणी लोकांची मनःस्थिति आहे—मग ते सत्ताधारी असोत वा सत्ताकांक्षी असोत. ही मंडळी जें कांहीं सहाय्य करूं शकतील—अर्थात् तें योग्य स्वरूपाचें असलें पाहिजे—त्याबद्दल भूदान-आंदोलन कृतज्ञच राहील. परंतु आपलें साध्य गांठण्यासाठीं तें सरकारच्या कृतीवर निर्भर राहणार नाहीं. त्याऐवजीं तें लोकांच्या कृतीवर निर्भर राहील, **दंडशक्ती-ऐवजीं जनशक्तीवर** निर्भर राहील. गांधीजी काय बरें म्हणाले— ' सत्ता हातीं आल्यानंतर मतपरिवर्तन हें आमचें स्वेच्छेनें स्वीकारलेलें साधन झालें पाहिजे. ' म्हणूनच विनोबाजी लोकांच्या कृतीवर पराकाष्ठेची भर देतात. क्रांति-हिंसक असो वा अहिंसक असो—लोक करतात, सरकारें करीत नाहींत. सरकार लोकांच्या मागोमाग जातें आणि त्यांनीं जें अगोदरच घडवून आणलें असेल त्यावर आपलें शिक्कामोर्तब करतें. म्हणूनच गांधीजींप्रमाणेंच विनोबाजी कायद्यावर भर न देतां मतपरिवर्तनावर भर देतात. लोकांच्या आचारांत आलें कीं कायदा आपोआप तसा बनतोच हें त्यांना माहीत आहे, मग कोणता का पक्ष सत्तारूढ असेना.

### भूदानाचें राजकारण

भूदानाच्या राजकीय सिद्धान्ताचें यांतून दर्शन होतें. आपले हेतू साध्य करण्यासाठी सत्तेचा उपयोग करून घ्यावा म्हणून सत्ता हस्तगत करण्याचें या चळवळीचें उद्दिष्ट नाहीं. त्यामुळेंच, सत्ता काबीज करण्याकरितां एखादा राजकीय पक्ष उभा करण्याची किंवा स्वतः बनण्याची तिची इच्छा नाहीं.

सरकारला काय पाहिजे किंवा नको याचा विचार न करतां, लोकांनीं स्वतःच्या जीवनांतच तशी क्रांति घडवून आणावी याकरितां लोकांच्या मनांत बदल घडवून आणणें, आणि तद्द्वारां समाजांत क्रांति करणें हें या चळवळीचें लक्ष्य आहे. तिचें दुसरें लक्ष्य हें आहे कीं, पक्षांच्या किंवा लोकसभांच्या मध्यस्थीशिवाय लोकांनीं आपला कारभार सरळ आपणच करूं लागावें. अराज्यवाद किंवा साम्यवाद यांच्या दृष्टीपुढें आहे त्याप्रमाणें गांधीवादहि अंतीं शासनविरहित समाजरचनाच आपल्यापुढें पाहतो. आज राज्यसंस्था ही तिच्या सर्वंकष स्वरूपांतच नव्हे तर सर्वकल्याणकारी रूपांतसुद्धां स्वतःकडे अधिकाधिक सत्ता आणि जबाबदाऱ्या घेत चालली आहे. कल्याणकारी सरकार ' कल्याणकारी ' च्या नांवाखालीं सर्वंकष सरकारांइतकेंच मनुष्याला आपला गुलाम बनविण्याची धास्ती वाटू लागली आहे. लोकांनीं आतां जोर करून हळूहळू जडणाऱ्या या पक्षाघाताला थांबविलें पाहिजे. कल्याणकारी सरकार लोकांनींच निर्माण केलेलें असलें तरीसुद्धां या विधानाला बाध येत नाहीं. लोकशाहीच्या पद्धतीनें निवडणुकी करण्याची यंत्रणा तयार केली तरी १८ कोटी ( प्रौढ मतदार ) लोक म्हणजे ५०० प्रतिनिधी असें समीकरण होऊं शकत नाहीं. हे १८ कोटी जितक्या प्रमाणांत आपला कारभार आपणच पाहूं लागतील तितक्या प्रमाणांत राज्यसंस्थेची सत्ता आणि कार्यें मर्यादित होतील आणि खरी लोकसत्ता अंमलांत येईल. अंतीं जें साधावयाचें त्याशीं सुसंगत अशी जर तात्कालिक उपाययोजना नसेल तर मूळच्या साध्याशीं अत्यंत विसंगत अशा ठिकाणीं आपण जाऊन पोंचतों हें कम्यूनिस्ट देशांच्या अनुभवानें दिसून आलें आहे. राज्यसत्तारहित समाजाचें महान् ध्येय आपल्यापुढें ठेवून कम्यूनिस्ट हे प्रत्येक गोष्ट राज्यसत्तेच्या मार्फत करूं निघाले. परिणाम असा झाला कीं, राज्यसत्तेला अधिकाधिक बळ मिळत गेलें आणि ती गळून पडण्याऐवजीं सर्वंकष असें स्वरूप तिला आलें.

याचकरितां भूदान किंवा सर्वोदय–आंदोलन आग्रह धरतें कीं, जर आपलें ध्येय शासनविहीन असा कारभार चालला पाहिजे हें असेल तर आपण आत्तांच अशी परिस्थिति निर्माण केली पाहिजे कीं, ज्यामुळें लोक

८५५२

अधिकाधिक स्वावलंबी बनतील आणि राज्यावरील त्यांचें अवलंबन कमी कमी होत जाईल.

राज्यसंस्था संपूर्णपणें नाहींशी होणार आहे कीं नाहीं कुणास ठाऊक, परंतु जर अहिंसक लोकशाहीचें ध्येय आपण मानीत असूं तर तें अंमलांत आणण्याची आतांपासूनच सुरुवात केली पाहिजे. ज्या लोकांना राज्य नको आणि जे त्यावर कमींत कमी अवलंबून राहूं इच्छितात त्यांनीं स्वत च संयमी, स्वयंशासित, न्यायी आणि परस्परसहयोगी बनलें पाहिजे, हें सांगण्याची गरज नाहीं. लोक तसें बनतील तेव्हां आणि सरकारें गळून पडतील किंवा पुष्कळ प्रमाणांत क्षीण होतील तेव्हांच जगांत शांति नांदूं लागेल. सरकारें युद्ध बंद पाडूं शकणार नाहींत, सरकारांपासून मुक्त झालेले लोकच तें करूं शकतील.

भूदान-आंदोलन या अर्थानें संपूर्णपणें राजकीय आहे. माणसाला आणि समाजाला इतकें आमूलाग्र बदलून टाकण्याचा उद्देश ठेवणारें आंदोलन अराजकीय असूंच शकत नाहीं. पण तें राजकारण मीं वर म्हटलें तसें आहे; निवडणुकीचें, पक्षांचें, सत्तेचें नाहीं. विनोबा म्हणतात त्याप्रमाणें तें ‘ राजकारण ’ नाहीं, ‘ लोककारण ’ आहे.

## जीवनदानाची गरज

या आंदोलनाची ही गगनस्पर्शी झेप, तिचें क्रांतिकारक आणि सृजनात्मक स्वरूप, नैतिकतेची आणि मानवतेची तिची दृष्टि हें सर्व लक्षांत घेऊनच त्या आंदोलनाप्रीत्यर्थ केलेलें जीवनदान समजून घ्यावयाचें आहे. जीवनदानावर झालेली टीका माझ्या पाहण्यांत आली आहे, ती ज्या लोकांनीं केली त्यांच्याकडून अधिक बुद्धीची अपेक्षा होती; या जीवनदानाची कोणत्याहि निःस्वार्थ जीवनदानाशीं बरोबरी करून त्यांनीं त्याचें विशिष्ट महत्त्व घालवूनच टाकलें. जीवनदानाचा विशिष्ट अर्थ हा आहे कीं, भूदानाचा जो पूर्ण आशय वर सांगितला त्या अर्थानें भूदानाहून अधिक महत्त्वाचें असें दुसरें काम आज नाहीं असें जीवनदानी लोकांनीं मानून, इतर कोणतेंहि काम त्याच्यापुढें गौण समजलें पाहिजे. जीवनदानाची हांक याच कारणाकरितां उठली कीं, कांहीं थोडे लोक सोडले तर, भूदाना-भोंवतीं असलेल्या पुष्कळ लोकांत ही निष्ठा कमी होती आणि त्यामुळें

त्याला आवश्यक तो एकविध भाव त्यांच्यांत नव्हता. गेल्या तीन वर्षांच्या अनुभवानें गांधीजींच्या क्रांतिकारक तत्त्वज्ञानाची आणि तंत्राची यशस्विता संशयातीतरीतीनें सिद्ध झाली आहे. अखिल भारताचें ३० एप्रिल १९५४ पर्यंत २५ लाख एकर जमीन मिळविण्याचें लक्ष्य पुरें होऊन तें ८ लाखांनीं वाढलें हें अभूतपूर्व यश आहे. परंतु जर गांधीजींचा आणि विनोबांचा संदेश खेड्यापाड्यांत आणि घराघरांत घेऊन जाण्याइतके कार्यकर्ते मिळाले असते, आणि ज्या कार्यकर्त्यांनीं खरोखरच आपला वेळ दिला ते जर योग्य प्रकारचे कार्यकर्ते असते, त्यांनीं मन लावून आणि एकविध भावानें जर हें काम केलें असतें, तर हा ३३ लाखांचा आंकडा १ कोटी-वर सहज गेला असतां. पण झालें असें कीं, बहुतेक भूदान-कार्यकर्त्यांनीं लहरीप्रमाणें कामें केलीं; पुष्कळांना या आंदोलनाचीं मूलभूत तत्त्वेंहि समजलेलीं नव्हतीं; पुष्कळांनीं स्वतःच्या जमिनीचा आणि इतर मालमत्तेचा योग्य हिस्साहि दिला नव्हता; पुष्कळांनीं, पुढें आपल्याला किंवा आपल्या पक्षाला या कामाचा फायदा मिळेल या आशेनें, पक्षीय आणि स्वार्थी हेतु ठेवून काम केलें. अशी परिस्थिति असूनहि इतक्या थोडक्या मुदतींत इतकें काम झालें हा एक चमत्कारच म्हटला पाहिजे.

परतु अहिंसेची हिंसेवर मात व्हावयाची असेल तर अहिंसेनें अधिक गतिमान् झालें पाहिजे. नाहींपेक्षां घटना तिला मागें टाकतील आणि हिंसा अहिंसेला गिळून टाकील. लोकांपुढें निकडीचे प्रश्न उभे आहेत. आणि अहिंसा जर ते लवकर सोडवूं शकली नाहीं तर इतिहास कांहीं अहिंसक कार्यकर्त्यांकरितां थांबून राहणार नाहीं. लोभ, स्वार्थ, अमानुषता, अन्याय, शोषण आणि असमानता यांनीं भरलेली आजची समाजरचना जर अहिंसा लवकर बदलूं शकली नाहीं तर हिंसा प्रवेश करील. हिंसेनें कोणताहि प्रश्न सुटणार नाहीं ही गोष्ट वेगळी; पण हें सारें लोकांना कळून येईल त्या वेळीं वेळ निघून गेलेली असेल. दरम्यान अंधकाराच्या सैन्यानें ताबा घेतलेला असेल.

म्हणून बोधगयेला आम्हां कांहींजणांना वाटलें कीं, या परिस्थितीची निकड आणि अधिक गतीनें पुढें सरण्याची गरज प्रत्येकाला जाणवून देण्याची वेळ आली आहे. सर्व गोष्टी अनुकूल आहेत; काळ अनुकूल आहे; मधून मधून निराशाजनक गोष्टी घडल्या तरी एकंदरीनें लोकांचा पाठिंबा

उत्तम आहे. उणीव आहे ती इतर सर्व सोडून या महान् आंदोलनाला सर्वस्वीं बांधून घेणाऱ्या निष्ठावान आणि सुयोग्य कार्यकर्त्यांच्या पुरेशा दलाची. याकरितां जीवनदानाची ही हांक.

**कामाची निवड**

बोधगयेला व त्यानंतर या हांकेला मिळालेलें प्रत्युत्तर आश्चर्यकारक आहे. पण तेवढें पुरेंसें नाहीं. कामाचा पर्वत पडला आहे. ५ कोटी एकर जमीन मिळवावयाची आहे आणि ती वांटावयाची आहे. भूहीनांना शेतीचीं साधनें पुरवावयाचीं आहेत. जेथें भूदान यशस्वी झालें आहे त्या खेड्यांत व्यवस्था निर्माण करावयाची आहे. ५ लाख खेडयांत ग्रामराज्य, लहान-मोठ्या शहरांत संपत्तिदान आणि शेवटीं पुंजीवादाचें विश्वस्तभावांत रूपांतर, अशा अनेक गोष्टी करावयाच्या आहेत.

मनुष्य आज स्वनाशाकडे चालला आहे. जग या कडयावरून कोसळूं पाहत आहे. त्याला वांचवायचें असेल तर त्याची घडण भूदानाच्या किंवा सर्वोदयाच्या मार्गानें केली पाहिजे. आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत भूदानाची, अर्थात् त्याच्या अत्यंत व्यापक अर्थानें, आज गरज आहे.

हें थोर कार्य आम्हांला पाचारण करीत आहे. आमचा पाठिंबा आणि आमचा भक्तिभाव यांना याहून लायक अशी दुसरी वस्तु मला दिसत नाहीं. या देशांत लाखों–कोटयवधि लोक आहेत. या प्रचंड लोकसंख्येंत अशीं कांहीं लाख माणसें–स्त्री-पुरुष–निघणार नाहींत काय कीं जीं निःस्वार्थीपणानें, हिंमतीनें, दूरदृष्टीनें या ऐतिहासिक चळवळींत स्वतःला फेंकून देतील? भावी इतिहास, निदान भारताचा इतिहास तरी, या प्रश्नाच्या उत्तरावरच अवलंबून आहे.

**तरुणांना आवाहन**

इंग्रजांचें राज्य येथें होतें तेव्हां मोठमोठ्या पगाराचें आणि प्रतिष्ठेचें आमिष पुढें असतांना तें बाजूला सारणारे तेजस्वी तरुण त्या वेळीं निघाले. आज आमच्या होतकरू तरुणांना सरकारी नोकरी हें प्रमुख आकर्षण आहे. तें अयोग्य आहे असें नाहीं. परंतु त्यांतहि जे अधिक भावनाशील आणि कमी संकुचित विचाराचे आहेत त्यांनीं हें ओळखलें पाहिजे कीं, नित्याचें राज्यकारभाराचें काम जरी आवश्यक असलें तरी तें नवीन राष्ट्र उभारूं

शकणार नाहीं. ज्यांना राजकीय महत्त्वाकांक्षा आहेत त्यांनीं हें ओळखावें कीं, कायदेमंडळें आणि सरकारेंसुद्धां राष्ट्राची नवनिर्मिति करूं शकणार नाहींत. आपलीं कामें त्यांनीं योग्य रीतीनें बजाविलीं तर त्यांची मदत होईल, पण कदाचित् तीं बाधकहि होण्याचा संभव आहे. केवळ लोकच स्वतःला घडवूं शकतात. म्हणून लोकांकडे जाणें, त्यांच्यांत राहणें आणि स्वतःच्या पायांवर उभें राहण्याला त्यांना मदत करणें ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे.

तरुणांनीं आपलीं अंतःकरणें शोधावींत. आपल्याला सुखासीन जीवन हवें असें त्यांना वाटतें काय ? सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रांत वर चढणाऱ्यांच्या जमातींत त्यांना सामील व्हावयाचें आहे काय ? ते वर कसे चढतात ? लोकांच्या पाठीवर चढूनच ना ? माझी खात्री आहे कीं, थोर ध्येयाकरितां कठोर आणि कष्टाचें जीवन आनंदानें घालविण्याला तयार असणाऱ्या तरुण स्त्री-पुरुषांची या देशांत वाण नाहीं. आतां वेळ घालविण्याला सवड नाहीं. कारण काळ धांवत आहे. उद्यांची वाट पाहूं तर कदाचित् वेळ निघून गेलेली असेल.

**जीवनदानींना दोन शब्द**

जीवनदानी लोकांकरितां दोन शब्द सांगतों. त्यांनीं आपलें घरदार, बायकामुलें सोडावींत, संन्यासी किंवा भिक्षु व्हावें, अशी अपेक्षा नाहीं. या जगांत राहूनच आपल्याला तें चांगलें बनवावयाचें आहे. परंतु जीवनदान ज्यानें केलें त्यानें कष्टाचें आणि साधें जीवन स्वीकारलें पाहिजे. त्याच्याजवळ जर जमीन किंवा उत्पन्न असेल तर त्यांतून योग्य तो हिस्सा त्यानें भूदानाला किंवा संपत्तिदानाला दिला पाहिजे. त्याला जर या आंदोलनांत कांहीं वेगळें उदरनिर्वाहाचें साधन नसेल तर त्यानें हवेवर जगावें असें कोणी म्हणणार नाहीं. अशा माणसाला अंतर्यामांतून जर या आंदोलनांत उडी घेण्याचा आदेश आला असेल तर त्यानें मागचा-पुढचा विचार न करतां उडी घ्यावी आणि श्रद्धा ठेवावी कीं, ज्या समाजाचा तो संपूर्ण वेळ देणारा सेवक बनतो तो थोर समाज त्याला विसरणार नाहीं. अर्थात् हें आंदोलन त्याची काळजी करण्याचा कसून प्रयत्न करील हें सांगणें नकोच. कोणी जीवनदानी एखाद्या राजकीय पक्षाचा सभासद असेल आणि त्या पक्षाचें सभासदत्व भूदानाच्या सिद्धान्ताच्या आणि आचाराच्या आड येणार

CEQ22

नाहीं असें त्याला वाटत असेल तर त्यानें त्या पक्षाचा सभासद राहण्यास हरकत नाहीं. परंतु त्याला आपल्या पदाचा किंवा निवडून आलेल्या स्थानाचा राजीनामा द्यावा लागेल आणि जन्मभर त्याला निवडणुकींत भाग घेतां येणार नाहीं. तथापि त्याला आपल्या सदसद्विवेकबुद्धीप्रमाणें मत देतां येईल.

**एक अभिनव राजकीय प्रयोग**

भूदान-आंदोलन हें इतर गोष्टींबरोबरच एक मोलाचा प्रयोग करीत आहे. शेवटीं अपक्ष लोकशाही निर्माण करणें हें त्याचें ध्येय आहे. आज वेगवेगळे पक्ष अस्तित्वांत आहेत, ही संक्रांतीची अवस्था आहे. म्हणून हें आंदोलन प्रत्येक पक्षांतील सभासदांना पाचारण करीत आहे कीं या, आपण सर्वोदयाकरितां मिळून काम करूं या. यांत त्याच्यापुढें दोन हेतू आहेत : पहिला असा कीं पक्ष आणि पक्षाचें सभासदत्व हें सर्वोदयाकडे होणाऱ्या प्रगतीला प्रतिबंधक होऊं नये, असें त्याला वाटतें; आणि दुसरा हा कीं, वेगवेगळीं राजकीय मतें असलीं तरीसुद्धां जेथें पक्षीय मतभेद नाहींत अशा क्षेत्रांत एकत्र काम करणें शक्य आहे हें शिकविण्याची त्याची इच्छा आहे. क्रांतीची आणि पुनर्निर्माणाची ही चळवळ लोकां-कडूनच चालली पाहिजे या दृष्टीनें असें एकत्र मिळून सर्वांनीं काम करण्यानें आणि त्यांतून येणाऱ्या अनुभवानें एखादी नवी राजकारणाची पद्धति निघण्यालाहि कदाचित् मदत होईल.

शेवटीं, माणसाची आणि समाजाची सुधारणा करण्याकरितां ज्यानें आपलें जीवनदान केलें आहे त्यानें आपलें स्वतःचें जीवन सुधारण्यापासून सुरुवात केली पाहिजे हें उघडच आहे. जीवदानी हा सामान्य मनुष्यच आहे, इतरां-प्रमाणेंच तो गुणदोषांनीं भरलेला आहे. परंतु नवा मनुष्य आणि नवा समाज बनविण्याच्या कामाला त्यानें आपलें आयुष्य वाहिलें याचा अर्थच हा कीं, त्यानें स्वतःला अगोदर नवीन बनविलें पाहिजे. या दृष्टीनें जीवनदान ही आध्यात्मिक जीवनयात्रा आहे. निदान मी तरी त्याचें त्याच दृष्टीनें महत्त्व मानतों.

जीवनदान करूं इच्छिणाऱ्यांनीं श्री. धीरेन्द्र मझुमदार, अध्यक्ष, सर्व सेवा संघ, खादीग्राम, पो. जमुई ( बिहार ) यांच्याशीं पत्रव्यवहार करावा. ते त्यांना मार्गदर्शन करतील.

---

अनुक्रम ९८६२०
विभाग
क्रमांक
नों. दि.

# विद्यार्थ्यांशीं हितगूज

तुम्ही जमलेली मंडळी ' विद्या–अर्थी ' असल्यामुळें आणि समजावून घेण्याचा विचार हा एक-दोन व्याख्यानांत पुरता होण्याजोगा नसल्यामुळें तुम्हीं सर्वोदयाचें व भूदानाचें वाङ्मय वाचावें, अभ्यासावें, त्याचा विचार करावा असें प्रथम मी तुम्हांला सांगू इच्छितों. खुद्द गांधीजींनीं लिहून ठेवलेलें वाङ्मय समुद्रासारखें आहे. इतकें सर्व वाचणें तुम्हांला शक्य न झालें तरी प्रो. निर्मलकुमार बसू यांनीं संपादन केलेलें ' सिलेक्शन्स फ्रॉम गांधीजी ' हें उत्तम पुस्तक तुम्हीं जरूर वाचावें. भूदानाचें वाङ्मय तर फारच थोडें आहे, तें तुम्ही सहज वाचूं शकाल. शाळा-कॉलेजांत हे विषय तुम्हांला शिकविले जाणार नाहींत, स्वाध्याय करूनच तुम्हांला ते समजावून घ्यावे लागतील.

**आपलें उद्दिष्ट काय ?**

शेवटीं आपलें उद्दिष्ट तरी काय आहे, आपण कुठें चाललों आहों, कशा प्रकारचा नवसमाज आपण निर्माण करणार आहों याची मनांत स्पष्टता झाली पाहिजे. केवळ खाणें, पिणें आणि भोग भोगणें एवढाच का आपल्या जीवनाचा हेतु आहे ? बहुतेक लोकांचा हेतु तोच असतो. परंतु कांहीं लोक असे असतात कीं, त्यांचें तेवढ्यानें समाधान होत नाहीं. या जीवनच्या पाठीमागें उद्दिष्ट काय याची तीव्र जिज्ञासा त्यांना स्वस्थ बसूं देत नाहीं.

आज ' स्टँडर्ड ऑफ् लिव्हिंग ' ( जीवनमान ) उंच करण्याची जणूं शर्यत लागली आहे. अमेरिकेसारख्या देशांत हें जीवनमान खूप उंच आहे; दर चार माणसांमागें तेथें एक मोटार पडते. तेथें गरीबाच्या घरांतसुद्धां रेडिओ आहे. आतां आणखी किती पुढें जाणार ? हें जीवनमान उंचावण्यालासुद्धां कांहीं मर्यादा आहेत कीं नाहींत ? त्यासाठीं किती झगडा, किती शोषण होत आहे ! याचा परिणाम राजकीय धोरणावर व संबंधावर होत असतो.

भारतांत जीवनमानाला गौण स्थान आहे. त्याचा इतका बडेजाव केला

जात नाहीं. शरीरयात्रा बरोबर चालावी इतक्यापुरतें अन्न, वस्त्र इत्यादींची व्यवस्था असावी, परंतु याहून अधिक शरीराची चिंता न करतां शरिराच्या पलीकडे जें कांहीं आहे, त्याच्या बाबतींत विचार करावा, इकडे आजवर भारतीय समाजाचें लक्ष राहिलें. आज या देशाचें नेतृत्व करीत आहेत त्यांनीं जीवनमान वाढविणें हें आमचें ध्येय असलें पाहिजे कीं दुसरें, याचा विचार करावा. पंचवार्षिक योजना इत्यादि योजना करतांना या गोष्टीचाहि विचार केला पाहिजे.

**सर्वोदय समाजाचा आदर्श**

हें मी मुद्दाम सांगत आहें. जो समाज आम्हांला घडवावयाचा आहे, तो मनुष्यांचा समाज आहे, तेव्हां त्या समाजांत माणसें कशीं असतील याचा निश्चय झाला पाहिजे. त्यांतील माणसें, त्यांतील विद्यार्थी काय 'जीवनमाना'चे गुलाम होतील ? 'सर्वोदय' सांगतो कीं अशा समाजांतील लोकांच्या इच्छा–आकांक्षा जास्तींत जास्त धन कमवावें, उपभोग घ्यावा या असणार नाहींत. कपडा मिळावा, पण तो रेशमीच पाहिजे असें नाहीं. शरिराचें रक्षण आणि लज्जारक्षण होण्यापुरता मोठाधाटा असला तरी चालेल, पण तो सर्वांना मिळावा. अन्न मिळावें पण तें साधें, पुरतें आणि पुष्टि देणारें असें सर्वांना समान असें असावें. माणसाच्या ज्या प्राथमिक गरजा आहेत त्या साध्या रूपांतच सर्वांना सारख्या प्रमाणांत मिळतील अशी व्यवस्था असावी. सारांश, या नव्या समाजांत लोकांचें लक्ष फक्त स्वतःच्या गरजा चांगल्यांत चांगल्या रीतीनें भागविण्याकडे न राहतां समाजविषयींच्या स्वतःच्या कर्तव्याकडे राहील–आत्मशुद्धीकडे राहील. नवा समाज शोषणरहित बनवावयाचा असेल तर शोषणाचें मूळच काढून टाकलें पाहिजे. शरिराच्या गरजा वाढवावयाच्या, त्यासाठीं जीवनमान उंचावत नेण्याचा प्रयत्न करायचा, यांतून शोषण नष्ट होणार नाहीं. विषमतेचें विष तसेंच राहील आणि तें या ना त्या रूपानें बाहेर फुटून समाजाला विकृत बनवील.

म्हणून आम्ही वरून नव्हे, आंतून समाज बदलूं इच्छीत आहों; म्हणजे आम्हांला व्यक्तीचें मन बदलायचें आहे. अर्थात् ही गोष्ट तुमच्यासारख्या बुद्धिवादी लोकांना अव्यवहार्य वाटते. ते म्हणतात, माणूस बदलायचा हें एक

तर पूर्णपणें शक्य नाहीं, आणि त्याला काळहि फार लागेल; त्यापेक्षां राज्यसत्ता हातीं घ्यावी आणि कायदे करून समाजाचें रूप बदलून टाकावें. ठीक आहे. पण जगांत हा प्रयोग आजवर झाला आहे त्याचा परिणाम काय निघाला तो तुम्ही पाहतां ना ? या देशांतसुद्धां कायद्यानें आपण सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहोंत, त्यांतून काय निघालें ? उदाहरण म्हणून अस्पृश्यतानिवारणाचा कायदा, बालविवाह-प्रतिबंधाचा किंवा दारूबंदीचा कायदा घ्या. त्यांनीं उद्दिष्ट साध्य झालें काय ?

## राष्ट्रीयीकरणानें काय साधलें ?

कायदा करून उद्योगांचें राष्ट्रीयीकरण केलें, त्यानें काय झालें ? राष्ट्रीयीकरणानें खासगी नफ्याची प्रवृत्ति राहत नाहीं आणि समाजाच्या गरजेची पूर्ति करण्याकरितांच उद्योग चालविले जातात हें तत्त्वतः खरें आहे. परंतु डायरेक्टर्स, मॅनेजर्स इत्यादींना होणारी प्राप्ति आणि कामगारांची प्राप्ति यांच्या प्रमाणांत अजूनहि फार मोठें अंतर आहे. आपल्या देशांत सर्वांत मोठा उद्योग रेल्वेचा आहे. त्याचें कायद्यानें राष्ट्रीयीकरण केलें आहे; पण हें प्राप्तींतील अंतर कमी झालें आहे का ? नाहीं. हें शोषणच नव्हे तर काय ? राष्ट्रीयीकरणानें फक्त खासगी कंपन्या गेल्या आणि त्या जागीं ऑफिसरशाही आली. म्हणून कायद्यानें उद्योगधंद्याचें राष्ट्रीयीकरण करण्यानेंहि शोषणाचा आणि विषमतेचा प्रश्न सुटत नाहीं. कायद्यानें जीवनांत परिवर्तन करूं असें म्हणाल तर कायदा ज्यांच्या हातीं, ते सर्वशक्तिमान होतील; स्टेटची शक्ति वाढत वाढत जाईल आणि नागरिकाची शक्ति कमी कमी होत जाईल.

आम्ही म्हणतों कीं वरून होणारें नियंत्रण कमी कमी होत जावें आणि खालून नियंत्रण वाढत जावें; असें करतां करतां वरचें कांहीं नियंत्रणच नाहीं अशी स्थिति येईल तर ती समाजाची सर्वोत्तम स्थिति होय. मार्क्स-एंजल्स यांनींसुद्धां समाजाचें अंतिम उत्तम स्वरूप सत्ताविहीन समाज हेंच मानलें होतें. हळूहळू लोकांची शक्ति वाढत जाईल, संघर्ष नाहींसे होत जातील, वर्ग नष्ट होतील आणि शेवटीं समाजांत परस्पर सहकारच राहील. मग स्टेटची जरूरच राहणार नाहीं. पण त्यासाठीं नागरिकाला तयार

करावें लागेल. हें कायद्यानें, वरून सक्ती करून होणार नाहीं, नागरिकत्वाची जाणीव जागृत करून होईल.

**समाज बदलण्याची सुरुवात**

तेव्हां आमचें उद्दिष्ट असा समाज घडवायचा हें आहे. या समाजांत सर्वांचा विकास, सर्वांना सुख, सर्वांना वर उठण्याची समान संधि मिळेल; कोणाचें शोषण होणार नाहीं, बहुतेकजण स्वयंशासित असतील, त्यामुळें वरून दंडाची गरज राहणार नाहीं. असा समाज निर्माण कसा करायचा ? व्यक्तीपासून आम्ही सुरू करतों. कायद्याची गरजच नाहीं असें आम्ही म्हणत नाहीं; परंतु जें सर्वांनीं अंतःकरणानें स्वीकारलें तें स्थिर करणें एवढेंच कायद्याचें काम राहील. समजा, सर्वांना पुरेल इतकें उत्पादन ( plentiful production ) जरी होऊं शकलें नाहीं तरी जेवढें झालें आहे तें सर्वांनीं मिळून वांटून घेण्याची भावना, विचार बदलल्यामुळें, राहील कीं नाहीं ? ही गोष्ट कायद्यानें कशी शक्य आहे ? लेनिननें, परिस्थिति ( environment ) पालटविली—चांगली केली कीं मनुष्य बदलेल—चांगला होईल, असें म्हटलें आहे. परंतु गेल्या ३५ वर्षांच्या प्रयोगानंतर—सुद्धां ही गोष्ट सिद्ध होऊं शकली नाहीं. मनुष्य बदलला नाहीं, सत्तेची गरज संपली नाहीं, उलट आजपर्यंत कधीं नव्हती इतकी सत्ता सर्वंकष आणि जबरदस्त होऊन बसली आहे. आज रशियांत कोणी कुणाचें शोषण करीत नाहीं म्हणतात, मग कां नाहीं मनुष्य बदलला ? इतकी सत्ता, इतकी दहशत, इतक्या कत्तली, इतकी गुप्तता हें सर्व ठेवण्याचें आणि वाढविण्याचें प्रयोजन काय ? परिस्थिति बदलविली तरी व्यक्ति बदलते असें होत नाहीं. समाजाचें स्वरूप वरून सुंदर ठेविलें तरी जर व्यक्ति सुंदर झाली नाहीं तर तो समाज केव्हां ढासळून पडेल हें सांगतां येणार नाहीं. लेनिननें रंगविलेलें समाजाचें अंतिम चित्र—कम्यूनिझम, आणि गांधीजींचें चित्र—सर्वोदयी समाज हीं सारखींच दिसतात. पण रशियांत त्याकडे जाण्याचें एक पाऊल चुकीचें पडतांच सारा उद्देश फसला.

आपल्या प्रयोगाची ही दशा होऊं नये असें जर आपल्याला वाटत असेल तर, व्यक्तीनें स्वतःवर नियंत्रण करावें, समाजविषयक कर्तव्याविषयीं स्वतःच जागरूक राहावें, याकडे आपल्याला गेलें पाहिजे. लोक म्हणतात,

व्यक्तीला सुधारायचें ही गोष्ट तर आजवर संत-महात्मे सांगतच आले आहेत. यांत तुम्हीं नवीन काय सांगितलें ? आणि त्यानें आजपर्यंत काय साधलें ? त्यानें दोन गोष्टी साधल्या : एक तर, आज आपण जें कांहीं आहोंत, माणुसकीची जी कांहीं आपली अवस्था आज आहे ती या संत-महात्म्यांमुळेंच आहे हें विसरतां कामा नये. संत-महात्मे झाले नसते आणि केवळ शिकंदर-नेपोलियन-समुद्रगुप्तच झाले असते तर आपण जंगली जनावरें बनलों असतों !

**गांधीजींचें विशिष्ट तंत्र**

पण दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे संत-महात्म्यांपासून मिळविलेला हा वारसा गांधीजींनीं उचलला आणि त्यांनीं तो समाजजीवनांत उतरविण्याचा प्रयोग केला. ही त्यांची पूर्वींच्या संतांपेक्षां मोठी देणगी आजच्या समाजाला आहे. मनुष्यांत प्रेम हाच मूलाधार आहे हें संतांनीं शिकविलें; पण गांधीजींनीं त्याचें एक तंत्र बनवून तें समाजकारण–राजकारणालाहि लागू करून दाखविलें. अहिंसेच्या तंत्रानें त्यांनीं स्वातंत्र्य मिळवून दिलें. हें तंत्र म्हणजे हृदयपरिवर्तनाचें तंत्र. हृदयपरिवर्तनावर शिकलेल्या ( अर्धविदग्ध ) लोकांचा विश्वास बसत नाहीं, त्यांच्यांत अश्रद्धा आहे. परंतु त्यावर खेड्यांतील लोकांचा विश्वास बसतो.

समाजांत द्वेष, मत्सर नसावा हा विचार कांहीं नवा नाहीं. पण ही गोष्ट प्रत्यक्षांत कशी यायची ? ती समाजांत प्रकट झाली पाहिजे. त्यासाठीं गांधीजींनीं सत्याग्रहाचें तंत्र शोधलें. इंग्रजांचें राज्य या देशांत अन्यायरूप आहे, पण तें काढून टाकण्यासाठीं लोकशक्ति संघटित कशी करायची ? गांधीजींनीं एक लहान गोष्ट निवडली—मिठाचा कायदा, आणि तो मोडण्यासाठीं लोकांची शक्ति एकवटली. आतां यांतून साध्य काय फक्त मिठाचा कायदा तोडणें हेंच होतें ? नाहीं. इंग्रजांची सत्ता खिळखिळी करणें हें साध्य होतें. मिठाच्या सत्याग्रहानें तें साधलें; तो सत्याग्रह एक प्रतीक म्हणून होता, शेवटीं इंग्रजसत्ता नष्ट करायची होती. या सत्याग्रहाच्या शक्तींतूनच पुढें इंग्रजांना येथलें राज्य सोडून जावें लागलें.

याच तंत्राचा अवलंब करून विनोबांनीं एक वस्तु निवडून काढली आणि तिच्या द्वारा नव्या समाजाची घडण आरंभिली आहे.

आजच्या समाजांत विषमता आणि शोषण चालू आहे. ही समाजव्यवस्था बदलायची आणि त्या जागीं समतेची आणि शोषणरहित अशी व्यवस्था आणायची याचें एक प्रतीक आणि प्रारंभ म्हणून त्यांनीं भूमीची समस्या हातीं घेतली. भूमि ही ईश्वराची देणगी म्हणून तिच्यावर कोणाची खासगी मालकी नसली पाहिजे, ती साऱ्या समाजाची झाली पाहिजे हें तुम्हांला मान्य असेल तर त्या मान्यतेचें चिह्न म्हणून तुम्ही आज आपल्या जमिनीचा सहावा, आठवा, दहावा हिस्सा द्या. आणि पुढें हळूहळू जमीन समाजाच्या म्हणजे गांवाच्या मालकीची करा. यांतलें तत्त्व जुनेंच आहे. जें कांहीं आहे तें सारें ईश्वराचें आहे, परंतु गांधींनीं आणि आतां विनोबांनीं त्याला सामाजिक क्षेत्रांत आंदोलनाच्या रूपानें मूर्त स्वरूप दिलें. जमिनीचा हिस्सा सोडणें म्हणजे स्वामित्वाच्या भावनेचा त्याग करणें. असें हें भूदान-आंदोलनाचें स्वरूप आहे. पण त्याचें अंतिम उद्दिष्ट केवळ जमीन मिळविणें आणि तिची वांटणी करणें एवढेंच नाहीं; सारी संपत्ति देवाची म्हणजे समाजाची अशी भावना सार्वत्रिक करणें, तसें वातावरण बनविणें, हें आहे. समाजाच्या आजच्या विचारांतच ही क्रांति आहे, या विचाराच्या क्रांतीच्या द्वारा समाजांत होणारी क्रांति चिरस्थायी होईल.

### विचार-बीज

ही विचार-क्रांति श्रीमंत-गरीब सर्वांमध्यें केल्याशिवाय ती सार्वत्रिक होणार नाहीं. म्हणून फक्त श्रीमंतांनाच स्वामित्व सोडायला आम्ही सांगत नाहीं, गरीबांकडेहि जातों आणि त्यांनाहि सांगतों. मालकीची भावना फक्त श्रीमंतांतच असते असें नाहीं. ती गरीबांतहि तितकीच असते. म्हणून लोकमत या बाबतींत तयार करायचें तर सर्वांनीं त्याग केला पाहिजे—गरीबांनींहि केला पाहिजे. ही गोष्ट त्यांना समजावून दिली पाहिजे. गरीब म्हणतील, आमच्यापाशीं अगोदर पोट भरण्यापुरतें नाहीं तर आम्ही देणार काय ? त्यांना सांगितलें पाहिजे कीं, जर तुम्ही तुमच्यांतलाच एक लहानसा तुकडा समाजाचा म्हणून काढून ठेवलांत तर ‘ सारी संपत्ति समाजाची, संग्रह हें पाप आहे ’ या तत्त्वाला तुमचें मत तुम्हीं दिलेंत असें होईल, आणि त्यामुळें हें तत्त्व मानणाऱ्यांची एक सेना तयार होईल. लोकमत बलवान् बनेल आणि त्यापुढें श्रीमंतालाहि मान वांकवावी लागेल. ज्यांच्यापाशीं वाजवी-

पेक्षां ज्यादा आहे ती चोरी आहे असें समाजांत मत फैलावलें म्हणजे कोणी आपल्यापाशीं ज्यादा राखण्याची इच्छाच करणार नाहीं.

कम्यूनिस्ट म्हणतात, तुम्ही गरीबांना फसवून लुटतां आहां. लेनिननें संघटना केली त्यांत कोण होते? काय लखपती श्रीमंत होते? गरीबच होते. आणि गरीबांचीच सेना करून त्यांचें त्यानें युद्धांत बलिदान दिलें. लेनिनला विचारलें तेव्हां तो म्हणाला, 'गरीबांच्या हितासाठीं गरीबांचीच जान कुर्बान झाली पाहिजे.' आम्ही मात्र कोणाची जान घेत नाहीं, मागत नाहीं. आम्ही फक्त दान मागत आहों. एक चिह्न म्हणून दान द्यायला सांगत आहों.

उत्तर प्रदेश, बिहार व उत्कल येथें अनेक गांवांतील लोकांनीं आपापल्या जमिनी सोडल्या आणि त्या गांवाच्या केल्या. त्यांच्या पुनर्वितरणाचें काम सुरू आहे आणि यांतून एक नवीन समाज बनूं लागला आहे. पुनर्वितरणाचा कायदा होईल कदाचित्, परंतु जमिनीचें ग्रामीकरण कायद्यानें करण्याची शक्ति मात्र आज कोणत्याहि पक्षांत नाहीं. जनता स्वतः ही गोष्ट करूं शकते, हें या गांवांनीं दाखवून दिलें आहे.

## संपत्तिदानांतून विश्वस्तभाव

लोक विचारतात दानानें भांडवलदार कसे नाहींसे होणार? हें एक पाऊल आहे. पुढचीं पावलेंहि पडूं लागलीं आहेत. संपत्तिवानाकडेहि आम्ही संपत्तिदान म्हणून सहावा हिस्सा आज मागत आहों. तें एक चिह्न आहे. उद्यां आपल्या साऱ्या संपत्तीचें विसर्जन तुम्हांला करायचें आहे हेंहि आम्ही त्याबरोबरच त्यांना सांगतों. आज एकदम त्यांची ही मानसिक तयारी होणार नाहीं म्हणून सहावा हिस्सा. या सहाव्या हिश्याचे ट्रस्टी बनण्याचें शिक्षण आम्ही त्यांना देतों, त्यांतूनच पुढें ते आपल्या साऱ्या संपत्तीचेहि ट्रस्टी बनणार आहेत. त्यांची दृष्टिच बदलून जाणार आहे. आज ३००० रु. पगार घेणाऱ्या रेल्वेच्या मॅनेजरला जर ही दृष्टि आली तर तोच म्हणेल कीं, मी इतका पगार कां घ्यावा? तो आपण होऊन आपला पगार कमी करून घेईल आणि त्याच्या ज्ञानाचा फायदा मात्र समाजाला होतच राहील. आज मात्र याच्या उलट मानसिक स्थिति आहे. जास्तींत जास्त घ्यावें आणि कमींत कमी द्यावें. विश्वस्तदृष्टि आली तर ही स्थिति कशी राहील?

जास्तींत जास्त काम आणि गरजेपुरतें दाम अशी स्थिति येईल. हीच आदर्श अवस्था मार्क्सच्या 'शासनविहीन समाजांत' मानली आहे ना—'From each according to his capacity to each according to his needs ?' आज जे संपत्तिदानाचा हिस्सा देतील त्यांना हा विचार मंजूर आहे असा त्याचा अर्थ आहे. दहा-वीस भांडवलदार जर असे ट्रस्टी बनले तर समाजाचें रूप पालटण्याला, मूल्यें बदलण्याला वेळ लागणार नाहीं. ही क्रांति राष्ट्रीयीकरणानें होणार नाहीं.

## विद्यार्थ्यांकडून अपेक्षा

आतां विद्यार्थ्यांनीं या बाबतींत काय करावें ? विद्यार्थ्यांकडून पहिली मागणी ही आहे कीं, त्यांना जर ही गोष्ट मान्य असेल, हें मूल्य समजलें असेल तर त्यांनीं कॉलेज सोडून द्यावें आणि आपलें जीवन या कामाला वाहावें. आज आकाशांत हिंसेचे काळे ढग जमले आहेत. समाजांत जीं चुकीचीं मूल्यें मानलीं गेलीं आहेत त्याचा हा परिणाम आहे. युद्ध होण्याचा संभव दिसत आहे. आतां जर युद्ध पेटलें तर तें पूर्वींच्या युद्धाहून महाभयानक होईल. यांतून कोण वांचेल तें सांगतां येत नाहीं. आणि जो वांचेल तो मनुष्य राहाणार नाहीं. विज्ञानानें भयानक शस्त्रें निर्माण केलीं तीं त्यांना आणि साऱ्या मानवजातीला खाऊन टाकणार आहेत. म्हणून सर्व शास्त्रज्ञांनीं एकत्र जमून यापुढें आम्ही विज्ञानाचा हिंसेशीं संबंध जोडणार नाहीं अशी प्रतिज्ञा केली, तरच जगाचा तरणोपाय आहे. म्हणून विनोबा म्हणतात कीं, विज्ञानाचा हिंसेशीं संबंध जडल्यानें विज्ञान आणि समाज हीं दोन्ही समाप्त होतील. विज्ञान जर जिवंत राहायचें असेल तर त्याचा अहिंसेशींच संबंध जोडला पाहिजे.

म्हणून या महान् कार्याप्रीत्यर्थ तरुणांनीं कॉलेज सोडलें तर तें अत्यंत आवश्यक आहे. त्यांनीं स्वतःचें जीवन अशा रीतीनें समाज बदलण्याच्या कामीं लावावें. त्यायोगें जो आत्मसंतोष त्यांना लाभेल तो डिग्र्यांनीं लाभणार नाहीं. म्हणून आमची पहिली मागणी जीवनदानाची आहे. वेळ थोडा आहे, काम फार मोठें आहे.

पण जर एवढा संकल्प त्यांना करणें शक्य नसेल तर त्यांनीं किमान

एक वर्ष या कामासाठीं द्यावें. हें दिलेलें वर्ष फुकट गेलें असें ह म्हणजे उलट जें कॉलेजांत मिळणार नाहीं तें मिळविल्याची त्यांना र माझ्या हातांत जर सत्ता आली तर मी असा कायदा करीन्निननें वर्षभर आम्ही सांगतों तें समाजकार्य विद्यार्थी करील तरच त्यीवच मिळेल. पण ही गोष्टसुद्धां कायद्यानें होणार नाहीं. कारण का दिलें. सक्ती कशी करणार ? म्हणून आईबापांनीं सांगितलें पाहिजे, चीच आणि समाजाची सेवा कर, त्यानें जें जीवनदर्शन होईल तें डिग्रीपोगत तरी पटींनीं अधिक आहे. माझ्या विद्यार्थिदशेंत अमेरिकेंत मल यला शिक्षण बंद करून कष्टाचीं कामें करावीं लागलीं होतीं, आणि त्य कांहींच नुकसान झालें नाहीं, उलट फायदाच झाल्याचा म ग त्या आला. युद्धामध्यें सैनिक बनून जाणें ही जर देशभक्ति आहे तर लोक ाम आयुष्य देणें ही देशभक्ति नव्हे ? एवढें जर तुमच्या हातून होणार न ा- देशाला काय गौरव वाटावा तुमच्याबद्दल ? काय उपयोग आहे तुमचा नें

गांवोगांव फिरा, लोकांना हा विचार समजावून द्या. ज्यांची आहे त्यांनीं दानपत्रें भरून घ्यावींत.

ही अपेक्षा माझी तुमच्याकडून आहे.

ता. ४-७-१९५४

REFBK-0008526
अनुक्रम ३५८.५.२०
विभाग सं.गी.
क्रमांक ८८१
नों. दि. १९५२५५
वाचनालय
८५१२६

## महाराष्ट्र भूदान प्रकाशनें:—

| | | |
|---|---|---|
| ❀ आंदोलन | किंमत | ३ आणे |
| ❀ भूमिका | ,, | १ आणा |
| ❀ शंका-समाधान | ,, | ३ आणे |
| ❀ भूदान-पद्यमाला | ,, | २ आणे |
| ❀ गांवाचें गोकूळ | ,, | ४ आणे |

आणि भूदानासंबंधींचें हिंदी वाङ्मय

★

प्रकाशक : सदाशिव जगन्नाथ ऊर्फ भाऊ धर्माधिकारी,
सहमंत्री, महाराष्ट्र सेवा संघ, ३६१ सदाशिव पेठ, पुणें २.
मुद्रक : रा. ना. सरनाईक, सुलभ मुद्रणालय, २९१ शनिवार, पुणें २.